माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०२०/२०१७-१८
दि.१६/०२/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.सजी आय.पी., ................अपिलार्थी
शॉप क्र.८, हॅप्पी होम अपार्टमेन्ट क्र.१,
शांती पार्क, मिरारोड (पूर्व),
ता.जि.ठाणे.४०११०७.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

## -: विवेचन :-

श्री.सजी आय.पी. यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांचेकडे दि.२९/१२/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

कोणत्या आधारे शास्ती कर व शास्तीवरचे व्याज लावण्यात येते. त्याची सर्व माहिती.

१) भोगवटा दाखला नसलेला, नकाशा प्रमाणे बांधण्यात आलेली इमारतींना कोणत्या आधारे शास्ती कर लावण्यात आलेला त्या संबंधित शासनाच्या आदेशाची प्रत.
१-a. ठरावाची प्रत.
१-b. शासन परिपत्रक.

२) भोगवटा दाखला नसलेला, नकाशाप्रमाणे बांधलेला एकुण किती इमारतींना शास्ती कर लावण्यात आला.

३) शास्ती कर लावण्यात आलेल्या विरोधात व्यक्तिश: आपणाकडे आलेले तक्रार अर्जाची माहिती.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत मागितलेली माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.०७/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व उप-कर निर्धारक व संकलक (कर), सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.३ यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१६/०२/२०१८ रोजी दुपारी १२.१० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/२२०/२०१८ दि.१४/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर), सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.२९/१२/२०१७ रोजीच्या पत्रानुसार मला माहिती दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.३ यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत मुद्देनिहाय सुधारित माहिती विनाशुल्क देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.सजी आय.पी.,
शॉप क्र.८, हॅप्पी होम अपार्टमेन्ट क्र.१,
शांती पार्क, मिरारोड (पूर्व),
ता.जि.ठाणे.४०११०७.

२) जन माहिती अधिकारी तथा
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

३) सहा.जनमाहिती अधिकारी तथा
कर निरिक्षक, प्रभाग क्र.३

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.